## ११) बँक सेवक कर्जे ः

### १) नोकर वाहन कर्जे :-

बँकेचे सेवेत कायम असणाऱ्या सेवकांना "सेवक वाहन कर्ज" योजनेखाली दुचाकी व चारचाकी वाहन खरेदीसाठी एकूण कोटेशनच्या ९० % व जास्तीत जास्त रु.६.०० लाख मात्र वाहन खरेदीसाठी कर्जपुरवठा करणेचे धोरण आहे.

### २) नोकर घर बांधणी कर्जे :-

१ बँकेच्या सेवेमध्ये कायम असणाऱ्या सेवकांना सेवक घर बांधणी, घर खरेदी/फ्लॅट खरेदी/रोहाऊस खरेदी करणेचे बँकेचे धोरण असून, यापूर्वी बँक सेवक घर कर्ज योजनेचा लाभ न घेतलेले सेवक मुळ व पुरवणी कर्जास पात्र राहतील तसेच ज्या सेवकांनी यापूर्वी सवलतीच्या व्याजदराची मुळ कर्ज व पुरवणी कर्जाची उचल केली आहे पण सध्या अशा कर्जाची येणेबाकी नाही असे सेवक नविन धोरणानुसार नव्याने मुळ व पुरवणी घर कर्ज घेणेस पात्र राहतील. कर्जमर्यादा, व्याजदर व मुदत -

(रु.लाखांत)

| अ.नं. | तपशिल | कर्जमर्यादा | व्याजदर | मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ कर्ज | १५.०० | ६ % | २० वर्षे |
| २ | पुरवणी कर्ज | १०.०० | ९ % | २० वर्षे |
| | **एकूण -** | **२५.००** | | |

### ३) बँक सेवक गृहउपयोगी कर्जे :-

बँकेचे कर्मचारी व अधिकारी यांना गृहउपयोगी वस्तू खरेदीसाठी, मुलीचे लग्नासाठी, मेजर ऑपरेशन, शैक्षणिक फी खर्च व कॉम्प्युटर लॅपटॉप खरेदीसाठी खालीलप्रमाणे धोरण ठरविणेत आलेले आहे.

#### १) गृहउपयोगी वस्तू खरेदीसाठी कर्ज -

१) सदर योजनेखाली टी.व्ही., फ्रिज, मिक्सर, फर्निचर, स्टील कपाट, वाशिंग मशिन, घरगुती पिठाची चक्की, स्वयंपाक गॅस इत्यादी तत्सम ग्राहकोपयोगी/गृहउपयोगी, फक्त नवीन वस्तू खरेदी करणेसाठी कर्ज वितरण करणेत येईल.

२) कर्ज मुदत - ५ वर्षे राहील.

३) कर्ज मर्यादा - कोटेशनच्या ८० % किंवा श्रेणीनिहाय मर्यादेइतपत (द्वितीय श्रेणीवरील अधिकारी रु.३००००/- क्लेरिकल व तृतीय श्रेणी रु.२५०००/- व शिपाई, ड्रायव्हर रु.२००००/-) यापैकी कमी असणारी रक्कम कर्ज म्हणून मंजूर करता येईल.

**२) मुलीच्या लग्नासाठी कर्ज -**

१) सदर योजनेखाली मुलीच्या लग्नासाठी प्रचलित धोरणानुसार सर्वसाधारण बाबी विचारांत घेऊन कर्ज मंजूर करणेत येईल.

२) कर्ज मुदत - ५ वर्षे राहील.

३) कर्ज मर्यादा - रु.५००००/- पर्यंत

**३) मेजर ऑपरेशनसाठी -**

१) सदर योजनेखाली कर्मचारी स्वत:, मुलगा, अविवाहीत मुलगी, आई व वडील यांचे मेजर ऑपरेशनसाठी कर्ज मंजूर करणेत येईल.

२) कर्ज मुदत - ५ वर्षे राहील.

३) कर्ज मर्यादा - रु.५००००/- पर्यंत

**४) शैक्षणिक फी कर्जासाठी -**

१) सदर योजनेखाली मुलगा, अविवाहीत मुलगी, पती व पत्नी यांचेसाठी विशिष्ठ कोर्ससाठी व उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या एकत्रित फी खर्चासाठी कर्ज मंजूर करणेत येईल.

२) कर्ज मुदत - ७ वर्षे राहील.

३) कर्ज मर्यादा - रु.१५००००/- पर्यंत

**५) कॉम्प्युटर, लॅपटॉप व प्रिंटर खरेदीसाठी -**

१) सदर योजनेखाली कॉम्प्युटर, लॅपटॉप व प्रिंटर खरेदीसाठी कर्ज मंजूर करणेत येईल.

२) कर्ज मुदत - १० वर्षे राहील.

३) कर्ज मर्यादा - रु.५००००/- पर्यंत

## ४) बँक सेवक मुदती कर्जे :-

बँकेचे सेवेत कायम असणाऱ्या सेवकांना "सेवक मुदती कर्ज" योजनेखाली घरगुती कारणासाठी कर्जपुरवठा करणेचे धोरण असून, अटी/शर्ती खालीलप्रमाणे.

१ कर्जमर्यादा - मुदती कर्ज मर्यादा रु.१०.०० लाख मात्र राहिल.

२ मुदत व व्याजदर - कर्जाची मुदत १० वर्षे अथवा नोकरीच्या उर्वरीत कालावधी यामधील कमीत कमी कालावधी इतपत राहील व सदर कर्जासाठी व्याजदर द.सा.द.शे. ११.०० % राहील.
(वरील व्याजदर प्रचलित धोरणानुसार राहील)